जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID** : crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

पुणे पोलीस
Pune Police

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

# दैनंदिन गुन्हयांची प्रेसनोट

## पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर
## प्रेस नोट दि.२५/१०/२०२३
## दि.२४/१०/२०२३ रोजी रात्रौ ००/०० वा.ते २४/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

**भाग-१ ते ५ चे गुन्हे**

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | खडकी पो स्टे ३९४/२०२३,भादविक ३९४,५०६ |
| **फिर्यादी** | एक नागरीक,वय ८० वर्षे,रा.पत्रा चाळ,बोपोडी,पुणे |
| **आरोपीत** | एक अनोळखी इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दिनांक २४/१०/२०२३ रोजी सकाळी १०/३० वा.फिर्यादीचे घरासमोर पत्रा चाळ सावंत नगरीचे मागे स.नं.२४ बोपोडी,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे त्यांचे राहते घरासमोर खुर्चीवर बसले असताना,नमुद इसमाने फिर्यादी यांचे समोरुन गल्लीतुन पायी जात असताना,त्याने अचानक फिर्यादीचे जवळ येवुन,त्यांचे गळयातील ३०,०००/- रुपये किंमतीची सोन्याची चेन जबरी चोरी करून नेली आहे. तसेच पोलीसांत तक्रार केली तर पाहुन घेण्याची धमकी दिली आहे |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. मालोजी कांबळे ९५५२५६१८३५ |

२

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | कोंढवा पो स्टे १०९१/२०२३,भादविक ३२६,५०६,४२७,३४,महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम ३७(१)(३) सह १३५ प्रमाणे |
| **फिर्यादी** | मारुती चव्हाण,वय २१ वर्षे,रा.लक्ष्मीनगर,कोंढवा-बुद्रुक,पुणे |
| **आरोपीत** | १.आशिष सुरेश दुधणीकर,वय-२४ वर्षे,रा.साई निवास बिल्डींग,गोकुळनगर,कोंढवा,पुणे २.धिरज लहु धेले,वय-१९ वर्षे,रा.लेन नं.०४,गोकुळनगर,कोंढवा-बुद्रुक,पुणे ३.अक्षय प्रताप निकम,वय-२४ वर्षे,रा.लेन नं.०३,गोकुळनगर,कोंढवा,पुणे (अटक) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२३/१०/२०२३ रोजी रात्रौ २१/४० वा. डायग्नोस्टिक सेंटर,सोमजी चौक,कोंढवा-बुद्रुक,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे डायग्नोस्टिक सेंटर,सोमजी चौक,पुणे येथे लॅब टेक्निशियन म्हणुन नोकरी करीत आहेत. सुखसागर येथील लॅबचा मालक यातील नमुद आ.क्र.३ याने त्याचे लॅबचा व्यवसाय कमी होत असल्याचे कारणावरुन,त्याचे सांगणेवरुन आ.क्र.१ व २ यांनी आपसात संगनमत करून,त्यांचे हातामध्ये धारदार हत्यारे घेवुन येवुन,फिर्यादी यांचे पुना डायग्नोस्टिक सेंटर येथे अचानकपणे प्रवेश करुन,लॅबमध्ये सुरेश मोतीलाल सहा हे त्यांचे मुलाची ब्लॅड टेस्ट करण्यासाठी आलेले असताना,सदर इसमांनी काहीएक कारण नसताना त्यांना धारदार हत्याराने मारले. त्यावेळी सुरेश सहा यांनी त्यांचा डावा हात पुढे केलेने त्यांचे डावे हाताचे पंजावर व बोटांवर मार लागुन त्यांना गंभीर दुखापत केली आहे. तसेच डायग्नोस्टिक सेंटर प्रोसिसींस युनिटचे दरवाजाची काच,एक्स-रे रुमचे पार्टिशियनची काच व मेन काऊंटरची काच तोडुन नुकसान केले. त्यानंतर मेडिको लॅबचा मालक यातील नमुद आ.क्र.३ याने फिर्यादी यांचे लॅबचे मालक व इतरांना नीट धंदा करायचा,तुमचे लॅबमुळे माझे लॅबचा धंदा कमी होत असल्याने,तुम्हाला घाबरविण्यासाठी मारहाण करुन तोडफोड केली आहे. तुम्ही जर येथुन पुढे माझे व्यवसायाचे आड आलात तर मी तुमच्या सर्वांकडे पाहुन घेईल असे बोलुन सर्व लॅब मालकांना धमकी दिली आहे. |
| **त.अंमलदार** | सहा.पोलीस निरीक्षक, विकास बाबर ९९६७९११०३३ |

३

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | चतुःश्रृंगी पो स्टे ७५४/२०२३,भादविक ३८१,३२८,३४ |
| **फिर्यादी** | एक महिला,वय ४५ वर्षे,रा.थेरगाव,पुणे |
| **आरोपीत** | घरकाम करणारे एक इसम व महिला (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दिनांक २३/१०/२०२३ रोजीचे १९/३० वा.ते दिनांक २४/१०/२०२३ रोजीचे १०/३० वा.चे दरम्यान १२ बी,कॉकपीट,अनंत सोसायटी,डी.पी.रोड,औंध,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांचे वडीलांचे घरी घरकाम करणारे यातील नमुद इसम व महिला यांनी आपसात संगनमत करून,फिर्यादी यांचे वडीलांचे घरी चोरी करण्याच्या उद्देशाने फिर्यादी यांचे वडील व त्यांचे मावस भाऊ यांना कोणतेतरी गुंगीकारक औषध देवुन,फिर्यादी यांचे वडीलांचे राहते घराच्या कपाटा मधील एकुण ४०,०००/- रुपये रोख रक्कम चोरून करून नेली आहे. |
| **त.अंमलदार** | सहा पोलीस निरीक्षक, झरेकर ७५८८१७००६१ |

## दि.२५/१०/२०२३ रोजी रात्रौ ००/०० वा.ते दु.१२/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | चतुःश्रृंगी पो स्टे ७५५/२०२३,भादविक ३९२,३४ |
| **फिर्यादी** | एक नागरीक,वय-२१ वर्षे,रा.लोणी-काळभोर,कदमवाक वस्ती,पुणे |
| **आरोपीत** | १.मोपेडवरील एक इसम व महिला २.मोटार सायकलवरील दोन अनोळखी इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दिनांक २४/१०/२०२३ रोजी दुपारी १६/२० वा.संचार भवन,पुणे ग्रामीण,बाणेर रोड,पुणे येथील पेट्रोल पंपावर पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे त्यांचे मालकाचे टुरीस्ट कारवर चालक म्हणुन काम करतात. फिर्यादी हे त्यांचे कारमध्ये पेट्रोल भरण्यासाठी नमुद ठिकाणी त्यांची कार वळवत असताना,त्यांचे समोरुन एक इसम व महिला हे मोपेडवरुन येत असताना,फिर्यादी यांचे कारचे बाजुला उजवे बाजुचे पुढील चाकाची धडक मोपेडला बसल्यामुळे मोपेडस्वार इसमाने फिर्यादीचे कारचा दरवाजा उघडुन,त्यांची कॉलर पकडुन,कारची चावी काढुन घेवुन,माझे गाडीचे झालेले नुकसान मला पाहीजे असे फिर्यादीस सांगुन,फिर्यादी व त्यांचे मित्र दगडे यांना कारमधुन बाहेर काढले. त्यानंतर त्याचे आणखी दोघेजण साथीदार यांना त्याचे मदतीसाठी बोलावुन घेऊन घेवुन,फिर्यादी यांचे कारमध्ये बसुन त्यांची टाटा झेस्ट कार क्र.एमएच/१४/जीयु/५५३० ही २,५०,०००/- रुपये किची अपघाताचे निमित्त करुन,भरपाई घेण्याचा बहाणा करुन जबरदस्तीने घेऊन गेले आहेत. |
| **त.अंमलदार** | सहा.पोलीस निरीक्षक, नरेंद्र पाटील ९०११७१९१०० |

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**